# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

**(Govt. of Maharashtra Undertaking)**


जा.क्र. मप्राशिप/सशिअ/KGBV/२०१४-१५/ 2493 दिनांक : 26 JUN 2014

## परिपत्रक

### सन २०१४-१५ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मार्गदर्शक सूचना.

राज्यातील १० जिल्हयातील ४३ शैक्षणिकदृष्ट्या मागास गटांमध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही केंद्र पुरस्कृत निवासी योजना दुर्बल घटक व वंचित गटातील शाळाबाह्य मुलींसाठी सुरू करण्यात आली आहे. या सर्व ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाची क्षमता प्रत्येकी १०० मुलींची आहे.

भारत सरकारने दिनांक २४ मार्च, २०१४ च्या पत्रानुसार कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या वित्तीय निकषामध्ये सुधारणा केली असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

**(रूपयात)**

| क्र. | खर्चाची बाब | जुने निकष | सुधारित निकष |
|---|---|---|---|
| १ | देखभाल प्रती मुलगी प्रतिमहा | ९००/- | १५००/- |
| २ | दर महा विद्यावेतन | ५०/- | १००/- |
| ३ | पुरवणी अध्यापन अध्ययन साहित्य, स्टेशनरी आणि इतर शैक्षणिक साहित्य प्रती मुलगी प्रतिमाह | ६००/- | १०००/- |
| ४ | वेतन | १२,००,०००/- | |
| ४.१ | १ मुख्याध्यापिका-नि-गृहप्रमुख दरमहा वेतन | | २५,०००/- |
| ४.२ | ४-५ पूर्ण वेळ शिक्षिका (शिक्षण हक्क कायद्यातील निकषानुसार दरमहा वेतन) प्रती शिक्षक | | २०,०००/- |
| ४.३ | २ ऊर्दू शिक्षिका (ज्या शहरी गटामध्ये मुस्लिम लोकसंख्या २०% पेक्षा जास्त आहे या प्रमाणे गरज असल्यासच) दरमहा वेतन प्रती शिक्षक | | १२,०००/- |
| ४.४ | ३ अंशकालीन शिक्षक दरमहा वेतन प्रति शिक्षक | | ५,०००/- |
| ४.५ | १ पूर्णवेळ लेखापाल दरमहा वेतन | | १०,०००/- |
| ४.६ | २ सहाय्यक कर्मचारी (शिपाई, चौकीदार) दरमहा वेतन प्रती कर्मचारी | | ५,०००/- |
| ४.७ | १ मुख्य स्वयंपाकी दरमहा वेतन | | ६,०००/- |




सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.

Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

| क्र. | खर्चाची बाब | जुने निकष | सुधारित निकष |
|---|---|---|---|
| ४.८ | २ सहाय्यक स्वयंपाकी दरमहा वेतन प्रती सहाय्यक स्वयंपाकी | | ४,५००/- |
| ५ | विशिष्ट कौशल्य प्रशिक्षण प्रती विद्यार्थीनी प्रती वर्ष | ५००/- | १,०००/- |
| ६ | विद्युत / जल आकार प्रती विद्यार्थीनी प्रती वर्ष. | ६००/- | १,०००/- |
| ७ | वैद्यकीय निगा / सादील प्रती मुलगी प्रती माह. | ७५०/- | १,२५०/- |
| ८ | देखभाल प्रती मुलगी प्रती वर्ष | ४००/- | ७५०/- |
| ९ | संकीर्ण प्रती मुलगी प्रती वर्ष | ४००/- | ७५०/- |
| १० | पूर्व तयारी शिबिरे प्रती मुलगी प्रती वर्ष | १५०/- | २००/- |
| ११ | पालक शिक्षक संघ / सह शालेय उपक्रम प्रती मुलगी प्रती वर्ष | १५०/- | २००/- |
| १२ | भाडयाची तरतूद प्रती मुलगी प्रती वर्ष | ४८,०००/- | ६,०००/- |
| १३ | क्षमता संवर्धन प्रती मुलगी प्रती वर्ष | ३००/- | ५००/- |
| १४ | स्वसंरक्षण प्रशिक्षण प्रती मुलगी प्रती वर्ष | -- | २००/- |

वरील सुधारित निकषानुसार अंमलबजावणी सन २०१४-१५ पासून करण्यात येईल. याबाबतची कार्यवाही करण्यासाठी भारत सरकारने सन २०१४-१५ या वर्षामध्ये राज्यात कार्यरत असलेल्या ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासाठी अनावर्ती स्वरूपाची रू. ४४२.६७ लाख तरतूद व आवर्ती स्वरूपाची रू. २०८५.३१ लाख अशी एकूण रू. २५२७.९८ लाख तरतूद मंजूर असून त्याचा तपशील पुढील तक्त्यात नमूद केला आहे.

**<u>अनावर्ती खर्च</u>**

**(रुपये लाखात)**

| क्र. | उपक्रम | Spill Over तरतूद |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम (नवीन) | ४३१.८२ |
| २ | संरक्षण भिंत | ५.७५ |
| ३ | बोरवेल / हातपंप | ३.९४ |
| ४ | विद्युत /पाणी (शुल्क) फक्त Spill Over | ०.४२ |
| ५ | बेडींग (replacement once in 3 years) | ०.७५ |
| | **एकूण** | **४४२.६७** |

## आवर्ती खर्च

(रुपये लाखात)

| क्र. | उपक्रम | मंजूर | |
|---|---|---|---|
| | | भौतिक लक्ष्य | आर्थिक तरतूद |
| १ | देखभाल प्रती मुलगी प्रती महा रू. १,५००/- प्रमाणे (मध्यान्ह भोजन योजनेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे) | ४३ | ७७४ |
| २ | दर महा विद्यावेतन रू. १००/- प्रती विद्यार्थीनी | ४३ | ५१.६ |
| ३ | पुरवणी अध्यापन अध्ययन साहित्य, स्टेशनरी आणि इतर शैक्षणिक साहित्य प्रती मुलगी प्रती माह रू. १,०००/- प्रमाणे | ४३ | ४३ |
| ४ | वेतन | | |
| ४.१ | १ गृहप्रमुख दरमहा वेतन रक्कम रू. २५,०००/- | ४३ | १२९ |
| ४.२ | ४-५ पूर्ण वेळ शिक्षिका (शिक्षण हक्क कायद्यातील निकषानुसार दरमहा वेतन रक्कम रू. २०,०००/-) प्रती शिक्षक | ४३ | ५१६ |
| ४.३ | २ ऊर्दू शिक्षिका (ज्या शहरी गटामध्ये मुस्लिम लोकसंख्या २०% पेक्षा जास्त आहे या प्रमाणे गरज असल्यासच) दरमहा वेतन रक्कम रू. १२,०००/- प्रती शिक्षक | ७ | २०.१६ |
| ४.४ | ३ अंशकालीन शिक्षक दरमहा वेतन रक्कम रू. ५,०००/- प्रती शिक्षक | ४३ | ७७.४ |
| ४.५ | १ पूर्णवेळ लेखापाल दरमहा वेतन रक्कम रू. १०,०००/- | ४३ | ५१.६ |
| ४.६ | २ सहाय्यक कर्मचारी (शिपाई, चौकीदार) दरमहा वेतन रक्कम रू. ५,०००/- प्रती कर्मचारी | ४३ | ५१.६ |
| ४.७ | १ मुख्य स्वयंपाकी दरमहा वेतन रक्कम रू. ६,०००/- आणि २ सहाय्यक स्वयंपाकी दरमहा वेतन रक्कम रू. ४,५००/- प्रती सहाय्यक स्वयंपाकी | ४३ | ७७.४ |
| ५ | विशिष्ट कौशल्य प्रशिक्षण प्रती विद्यार्थीनी रक्कम रू. १,०००/- प्रती वर्ष | ४३ | ४३ |
| ६ | विद्युत / जल आकार प्रती विद्यार्थीनी रू. १,०००/- प्रती वर्ष. | ४३ | ४३ |
| ७ | वैद्यकीय निगा / सादील प्रती मुलगी प्रती माह रू. १,२५०/- प्रमाणे. | ४३ | ५३.७५ |
| ८ | देखभाल प्रती मुलगी प्रती वर्ष रक्कम रू. ७५०/- | ४३ | ३२.२५ |
| ९ | संकीर्ण प्रती मुलगी प्रती वर्ष रक्कम रू. ७५०/- | ४३ | ३२.२५ |
| १० | पूर्व तयारी शिबिरे प्रती मुलगी प्रती वर्ष रक्कम रू. २००/- | ४३ | ८.६ |
| ११ | पालक शिक्षक संघ / सह शालेय उपक्रम प्रती मुलगी प्रती वर्ष रक्कम रू. २००/- | ४३ | ८.६ |
| १२ | भाडयाची तरतूद प्रती मुलगी प्रती वर्ष रक्कम रू. ६०००/- | ७ | ४२ |
| १३ | क्षमता संवर्धन प्रती मुलगी प्रती वर्ष रक्कम रू. ५००/- | ४३ | २१.५ |
| १४ | स्वसंरक्षण प्रशिक्षण प्रती मुलगी प्रती वर्ष रक्कम रू. २००/- | ४३ | ८.६ |
| | **एकूण** | **४३** | **२०८५.३१** |
| | **एकूण (अनावर्ती + आवर्ती)** | **४३** | **२५२७.९८** |

जिल्हा निहाय मंजूर तरतुदीचा तपशील **परिशिष्ट-अ** मध्ये दर्शविला आहे.

उपरोक्त प्रमाणे मंजूर उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी खाली नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहीत मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.

**<u>सर्वसाधारण सूचना</u> :**

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार इयत्ता १ ली ते ५ वी प्राथमिक व इयत्ता ६ वी ते ८ वी उच्च प्राथमिक असा प्राथमिक शिक्षणाचा स्तर दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामध्ये इयत्ता ५ वी ऐवजी इयत्ता ६ वी पासून प्रवेश देण्याबाबत या कार्यालयाने दिनांक २२/०५/२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे सन २०१४-१५ पासून राज्यातील सर्व ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षणाचा स्तर हा इयत्ता ६ वी ते ८ वी असा राहील.

२) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामध्ये दुर्बल घटक व वंचित गटातील मुलींना प्रवेश दिला जातो यामध्ये विशेष गरजाधिष्ठित मुलींना प्राधान्याने प्रवेश देणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत या प्रवर्गातील मुलींचे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील प्रमाण अत्यल्प आहे. याबाबत भारत सरकारने प्राधान्याने विशेष गरजाधिष्ठित मुलींना प्रवेश देण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार या कार्यालयाच्या दिनांक १६/०५/२०१४ च्या पत्रानुसार कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामध्ये किमान २५% जागा विशेष गरजाधिष्ठित मुलींसाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

३) भारत सरकारच्या मूल्यांकन पथकाने राज्यातील निवडक कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाची पाहणी करून सद्य:स्थितीचा आढावा घेतला असून त्याबाबतचा अहवाल भारत सरकारने संबंधित राज्यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे. त्यामधील निरीक्षण व शिफारसीनुसार कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील पायाभूत भौतिक सुविधा सुधारण्याची आवश्यकता आहे. प्रगती पथावरील व सद्य:स्थितीत सुरू न झालेली बांधकामे विहीत मुदतीत पूर्ण करणे

गरजेचे आहे. मुलींची सुरक्षितता, आरोग्य, स्वच्छता तसेच वृक्षारोपण, क्रीडांगण उपलब्धता, शालेय परिसर स्वच्छता, ग्रंथालयाचा उपयोग, संगणक वापर, इत्यादी बाबींकडे कटाक्षाने लक्ष देण्याची गरज आहे.

४) दर तीन महिन्यांनी जिल्हा स्तरावरून विशेष पथकामार्फत जिल्ह्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाची तपासणी करण्यात यावी. तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटी, विशेष उल्लेखनीय बाबी याबाबत संबंधितांना तातडीने कळविण्यात यावे. त्रुटींची पूर्तता झाली असल्याची संबंधित गट शिक्षणाधिकारी यांनी खातरजमा करावी.

५) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक असलेला निधी राज्य स्तरावरून थेट कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आवश्यक मंजूर बाबींवर नियमानुसार निधीचा विनियोग करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत अनाठायी, अवाजवी व अनावश्यक खर्च करण्यात येऊ नये. सर्व शिक्षा अभियान Framework for Implementation व Manual on Financial Management and Procurement मधील तरतुदीनुसार निधीचा विनियोग करण्यात यावा.

६) भारत सरकारने कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी Web Portal तयार केले आहे. सदर Web Portal वर दर तीन महिन्यांनी भौतिक लक्ष्य व आर्थिक तरतूद तसेच साध्य लक्ष्य व तरतूद याबाबतचा अद्ययावत तपशील भरण्यात यावा. सदरहू माहिती Upload न केल्यास भारत सरकारकडून त्यांच्या हिश्श्याचा निधी राज्यास उपलब्ध होणार नाही.

७) प्रत्येक कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / विभागीय शिक्षण उप संचालक यांची मान्यता घेण्यात यावी.

८) प्रत्येक कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाने यु-डाईसमध्ये अचूक माहिती भरणे बंधनकारक आहे. यु-डाईसमधील माहितीचा उपयोग योजनेची अंमलबजावणी, निधीचे वितरण, संनियंत्रण यासाठी करण्यात येणार आहे. त्यामुळे यु-डाईसमधील माहिती बिनचूक असणे गरजेचे आहे.

९) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामधील शिक्षकांची पदे अतिरिक्त शिक्षकांमधून समायोजनाने भरण्याबाबत विभागीय शिक्षण उप संचालक यांना दिनांक ०६/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या कार्यालयाच्या दिनांक ०३/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये स्वयंपाकी, चौकीदार ही पदे बाह्यसंस्थेमार्फत भरण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. सदर दोन्ही संवर्गातील रिक्त पदे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ सुरू होण्यापूर्वी भरण्याबाबतच्या सूचना भारत सरकारने दिलेल्या आहेत.

१०) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती, शैक्षणिक / व्यावसायिक अर्हता आणि नियत वेतन याबाबतच्या तरतुदी वेळोवेळी दिलेल्या शासन आदेशानुसार कार्यान्वित राहतील. तसेच इतर तरतूदी या **म.प्रा.शि.प.सेवा नियमावली १९९४** नुसार लागू राहतील.

**बांधकाम :**

१) ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासाठी बांधकाम मंजूर करण्यात आले आहे. यापैकी २८ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाची बांधकामे पूर्ण झालेली आहेत.

२) सद्य:स्थितीत ८ ठिकाणी बांधकामे प्रगतीपथावर आहेत. सदर बांधकामे मार्च, २०१४ अखेरपर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. याकारणास्तव, भारत सरकारने या ८ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांना इमारत भाड्याकरीता तरतूद मंजूर केलेली नाही.

३) आजमितीस ७ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाची बांधकामे अद्यापही सुरू झालेली नाहीत. या ७ ठिकाणच्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांसाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये

पूर्ण करण्याच्या अटीवर इमारत भाडे मंजूर केले आहे. तसेच सदरील बांधकामे सन २०१४-१५ मध्ये पूर्ण न झाल्यास ही बांधकामे रद्द करण्यात येतील अशा सूचनाही भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाने दिल्या आहेत.

४) त्याअनुषंगाने या कार्यालयाच्या दि. १४ फेब्रुवारी २०१४ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये प्रगतीपथावर असलेली सर्व बांधकामे पूर्ण करून नवीन इमारती स्थलांतरीत करण्यात याव्यात व सुरू न झालेली बांधकामे जून, २०१४ अखेरपर्यंत सुरू करुन सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत.

**उपक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सूचना :**

**१) देखभाल :** कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विद्यार्थीनी निर्वाहाकरिता प्रती विद्यार्थीनी रू. १,५०० /-प्रति महिना याप्रमाणे एकूण वार्षिक अनुदान रु. १८,००,०००/- मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये, किराणा साहित्य, भाजीपाला, फळे, दूध, गॅस सिलेंडर, सरपन, मांसाहार, या व्यतिरिक्त विद्यार्थीनींना दरमहा दिले जाणारे अंगाचे साबण, टूथपेस्ट, टूथब्रश, खोबरेल तेल, वॉशिंग पावडर, वॉशिंग सोप, कॉस्मेटीक पावडर, क्रिम, सॅनिटरी नॅपकीन, शॅम्पू, गणवेश, बूट, चप्पल, नाईट ड्रेस, स्वेटर, ट्रॅकसुट इत्यादी बाबींवर निधीच्या उपलब्धतेनुसार नियमानुसार खर्च करण्यात यावा. मुलींना देण्यात येणारा आहाराबाबत मध्यान्ह भोजन योजनेप्रमाणे (Consumer Price Index) अंमलबजावणी करण्यात यावी.

**२) दरमहा निर्वाह खर्च :** कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विद्यार्थीनींना दर महिन्याला आवश्यक असलेले दैनंदिन साहित्य निर्वाह खर्चातून खरेदी करता येईल. तसेच विद्यार्थीनीना ग्रीष्मकाली सुट्ट्यांच्या कालावधीतील सदरच्या निर्वाह भत्त्याच्या रक्कमेतून विद्यार्थीनींकरिता आवश्यक साहित्य मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जोडपत्रातील यादीनुसार खरेदी करावी.

**३) दरमहा विद्यावेतन :** सदर विद्यावेतन प्रत्येक मुलींचे वैयक्तिक बचत खाते राष्ट्रीयकृत बँकेत किंवा पोस्ट ऑफिसमध्ये उघडून दरमहा ५ तारखेपर्यंत जमा करण्यात यावी. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या मुलींचे बँकेत / पोस्टात बचत खाते शाळेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उघडण्यात यावे.

**४) पुरवणी अध्यापन अध्ययन साहित्य, स्टेशनरी आणि इतर शैक्षणिक साहित्य :** प्रती विद्यार्थीनी प्रती महा रक्कम रू. १,०००/- प्रमाणे मंजूर आहे. अध्ययन अध्यापन साहित्यासाठी देण्यात येणाऱ्या आर्थिक तरतूदीमधून प्रत्येक विद्यार्थीनींना दप्तर, रंगपेटी, कंपास, इत्यादी साहित्य वर्षातून एकदा दिले जाईल तर पेन दरमहा देण्यात यावा. पेन्सिल, खोडरबर, शॉर्पनर तीन महिन्यातून एकदा देण्यात यावे. वह्या मध्ये दोन रेघी, चार रेघी, डब्याची, प्रयोगवह्या, अक्षरलेखनासाठीच्या व चित्रकलेच्या वह्या यांचा समावेश असावा. मुलींना लागणाऱ्या वह्या व स्टेशनरी साहित्य पुरेशा प्रमाणात व मुलींच्या गरजेनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावे. चित्रकला परीक्षा माहे सप्टेंबर महिन्यात असल्याकारणाने कला शिक्षकांच्या मागणीनुसार आवश्यक सर्व साहित्य मुलींना जून-२०१४ मध्येच उपलब्ध करुन द्यावे.

**५) वेतन :**

**५.१) गृहप्रमुख :-** कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामध्ये सद्य:स्थितीत मुख्याध्यापिका-नि-गृहप्रमुख असे एकच पद कार्यरत आहे. भारत सरकारच्या सुधारित निकषानुसार गृहप्रमुख हे स्वतंत्र पद मंजूर करण्यात आले आहे. सदर पदी यापूर्वी कार्यरत असलेल्या मुख्याध्यापिकेस प्राधान्य देण्यात यावे. या पदाकरिता वेतन दर महा रक्कम रू. २५,०००/- याप्रमाणे अदा करण्यात यावे.

**५.२) ४-५ पूर्ण वेळ शिक्षिका :-** सद्य:स्थितीत प्रत्येक कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात ४ शिक्षक मंजूर असून त्याप्रमाणे कार्यरत आहेत. भारत सरकारने केलेल्या सुधारित निकषानुसार सन २०१४-१५ मध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासाठी ५ शिक्षक

मंजूर   झाले आहेत.  त्यांच्यासाठी प्रती शिक्षक प्रती माह रू. २०,०००/- याप्रमाणे आर्थिक तरतूद मंजूर आहे.  नव्याने मंजूर झालेल्या एका अतिरिक्त शिक्षक पदावर मुख्याध्यापिका म्हणून नियुक्ती करण्यात यावी.  त्यांना  रू. २०,०००/- प्रमाणे वेतन अदा करण्यात यावे.

मुद्दा क्र.५.१ व ५.२ मधील पदांची निवड जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या मुख्याध्यापिका नि गृहप्रमुख, शिक्षिका यांच्यामधून अनुभवी, व्यासंगी, उत्साही व्यक्तींची निवड करावी.

मुख्याध्यापिका व गृहप्रमुख यांच्या पदांची जबाबदारी, कर्तव्ये निश्चित करून ती कळविण्यात येतील.

**५.३)** **२ उर्दू शिक्षिका :-** राज्यातील फक्त परभणी जिल्ह्यातील ७ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासाठी प्रत्येकी दोन ऊर्दू शिक्षिका हे पद मंजूर करण्यात आले आहे. त्यांच्यासाठी प्रती शिक्षक प्रती माह  रू. १२,०००/- या प्रमाणे वेतन तरतूद मंजूर आहे.

**५.४)** **३ अंशकालीन शिक्षक :-** दरमहा वेतन रक्कम रू. ५,०००/- प्रती शिक्षक याप्रमाणे तरतूद मंजूर आहे.

**५.५)** **१ पूर्णवेळ लेखापाल :-** दरमहा वेतन रक्कम रू. १०,०००/- याप्रमाणे तरतूद मंजूर आहे.

**५.६)** **२ सहाय्यक कर्मचारी (शिपाई, चौकीदार) :-** दरमहा वेतन रक्कम रू. ५,०००/- याप्रमाणे प्रती कर्मचारी तरतूद मंजूर आहे.

**५.७)** **१ मुख्य स्वयंपाकी :-** दरमहा वेतन रक्कम रू. ६,०००/- याप्रमाणे तरतूद मंजूर आहे.

**५.८)** **२ सहाय्यक स्वयंपाकी :-** दरमहा वेतन रक्कम रू. ४,५००/- प्रती सहाय्यक स्वयंपाकी याप्रमाणे तरतूद मंजूर आहे.

६) **विशिष्ट कौशल्य प्रशिक्षण :** प्रती विद्यार्थीनी रक्कम रू. १,०००/- प्रती वर्ष तरतूद मंजूर आहे. यामधून मुलींमध्ये कौशल्य विकसनाकरिता व्यवसाय प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. व्यवसाय प्रशिक्षणाची निवड करताना मुलींची आवड, मुलींना व्यवसाय प्रशिक्षणाचा भविष्यात होणारा उपयोग याचा प्राधान्याने विचार करावा. व्यवसाय प्रशिक्षण देण्याकरिता प्राधान्याने ITI, लोकसेवा अंतर्गत दिले जाणारे प्रशिक्षण, जनशिक्षण संस्थान, मान्यताप्राप्त संस्था, सेवाभावी संस्था इत्यादीद्वारे प्रमाणपत्र प्रशिक्षण दिले जावे. जेणेकरून विद्यार्थीनींना सदरच्या प्रमाणपत्राचा भविष्यात उपयोग होईल.

**६.१) व्यवसाय प्रशिक्षणाचे प्रकार :** संगणक संबधित सर्व कोर्सेस, इंग्लिश स्पिकिंग, ब्युटीपार्लर, टेलरींग (कटींग व ड्रेस मेकींग), घरगुती विद्युत उपकरणाची दुरुस्ती, फोटोफ्रेम मेकिंग, फॅन्सी बॅग व पर्स बनविणे, स्क्रिन पेन्टींग, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग, फळे व भाज्या टिकविण्याच्या प्रक्रिया, सेंद्रीय, गांडूळ खत तयार करणे, रोपवाटीका तयार करणे, खेळणी तयार करणे. याशिवाय स्थानिक स्तरावर उपलब्ध व आवश्यक असणारे व्यवसाय प्रशिक्षण घ्यावयाचे असेल तर याकरिता जिल्हा कार्यालयाची मंजूरी घ्यावी व सदरील प्रशिक्षणाचे नियोजन करावे.

**६.२) व्यवसाय प्रशिक्षणाकरिता सूचना :**

६.२.१) ज्या व्यवसायात मुलींना आवड असेल तो व्यवसाय निवडीस प्राधान्य देण्यात यावे.

६.२.२) निवडलेल्या व्यवसाय प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षित प्रशिक्षकाची व्यवस्था करावी.

६.२.३) व्यवसाय प्रशिक्षणाकरिता एकूण ९० तासिकांचा कालावधी राहील.

६.२.४)प्रशिक्षण वेळेचे नियोजन शाळेच्या वेळेमध्ये अथवा शाळेच्या वेळेव्यतिरिक्त विद्यार्थीनींच्या दिनचर्येमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

६.२.५)प्रशिक्षण कालावधी हा संपूर्ण शैक्षणिक वर्षामध्ये सोईनुसार आयोजित करण्यात यावा.

६.२.६) आवश्यक असल्यास प्रशिक्षणाकरिता लागणारा कच्चा माल प्रशिक्षण सुरू करण्याआधीच विद्यालयात उपलब्ध करून घ्यावा.

६.२.७)प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थीनीने तयार केलेल्या साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात यावे.

७) **विद्युत / जल आकार प्रती विद्यार्थीनी रू. १,०००/- प्रती वर्ष :** दरमहा विद्युत देयक व पाणी देयक भरण्यात यावे. मुलींना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून आर.ओ.सिस्टीम मुलींची संख्या विचारात घेऊन प्रत्येक विद्यालयांमध्ये सदर लेखाशिर्षामधून खरेदी करण्यात यावे.

८) **वैद्यकीय निगा / सादील :** प्रती मुलगी प्रती माह रू. १,२५०/- प्रमाणे तरतूद मंजूर आहे. गरजेनुसार विद्यार्थिनींना आवश्यक वैद्यकीय मदत पुरविण्यासाठी तरतूद विनियोगात आणावी. तसेच मुलींचे आरोग्य व स्वच्छता यासाठी त्यांना स्थानिक शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांचेकडून नियमित मार्गदर्शन घेण्यात यावे. प्रत्येक मुलीची स्वतंत्र वैद्यकीय तपासणी फाईल तयार करण्यात यावी. विद्यार्थिनी आजारी पडल्यानंतर वैद्यकीय उपचार करुन त्यासाठी आलेल्या औषधाच्या पावत्या व डॉक्टरांना दिलेली फी याबाबत खर्चाच्या पावत्या फाईलमध्ये स्वतंत्र ठेवण्यात याव्यात. मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या सहपत्रात जोडलेल्या नमुन्यामध्ये नोंदी ठेवाव्यात. तसेच पुस्तिकेत दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

९) **देखभाल :** कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय इमारत, फर्निचर इत्यादीच्या देखभालीसाठी रू.७५,०००/- प्रमाणे तरतूद मंजूर आहे. आवश्यकतेनुसार देखभाल करण्यासाठी उपयुक्त साहित्य उपलब्ध करून घ्यावे. यासाठी अवाजवी खर्च करण्यात येऊ नये. सदर शिर्षाबाबत पुस्तिकेत दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१०) **संकीर्ण :** प्रत्येक कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासाठी रू. ७५,०००/- प्रमाणे संकीर्ण या उप लेखाशिर्षाखाली तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्याअंतर्गत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामधील मुलींना अत्यावश्यक सोयी सुविधा पुरविण्यासाठी प्रत्यक्ष गरज विचारात घेऊन खर्च करण्यात यावा. सदरचा खर्च शाळा व्यवस्थापन समिती व गट शिक्षणाधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावा. अनावश्यक बाबींवर खर्च करण्यात येऊ नये. सदर शिर्षाबाबत पुस्तिकेत दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

११) **पूर्व तयारी शिबिरे :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना (शाळाबाहय मुलांसह) शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल करुन त्यांच्या वयास अनुरूप समकक्ष वर्गामध्ये प्रवेश देणे बंधनकारक आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्गामध्ये शाळाबाह्य मुलींना प्रवेशित करून त्या मुलींची अभ्यासातील प्रगती सर्वसामान्य इतर मुलींच्या बरोबरीने साध्य करण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात यावे. या कामी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी विकसित केलेले पूरक साहित्य उपयोगात आणावे. या उपक्रमासाठी प्रती कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय रू. २०,०००/- प्रती वर्ष आर्थिक तरतूद मंजूर आहे. सदर शिर्षाबाबत पुस्तिकेत दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१२) **पालक शिक्षक संघ / सह शालेय उपक्रम :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम २१ नुसार सर्व शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती गठित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार शाळा व्यवस्थापन समिती गठित करावी. त्याप्रमाणे शाळा व्यवस्थापन समितीच्या, मातापालक संघ, शिक्षक पालक संघ यांच्या दरमहा बैठका घेण्यात याव्यात. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे व मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी सहशालेय उपक्रम, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यामधील सहभाग

वाढविण्यासाठी संबंधितांचे उद्‌बोधन करावे. यासाठी प्रती कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय रू. २०,०००/- तरतूद मंजूर आहे.

**१३) इमारत भाड्याची तरतूद :** इमारत बांधकाम सुरू न झालेल्या ७ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या इमारत भाड्याकरीता तरतूद मंजूर आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय जर शासकीय इमारतीत भरत असेल तर अशा शासकीय इमारतीस भाड्याची तरतूद देण्यात येऊ नये. तथापि, या इमारतीमध्ये आवश्यक असणाऱ्या पायाभूत भौतिक सुविधा जसे, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, विद्युतीकरण, इत्यादी बाबींसाठी इमारत भाड्याची मंजूर असलेली तरतूद तालुका स्तरीय संनियंत्रण समितीच्या मान्यतेने खर्च करता येऊ शकेल. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय खाजगी इमारतीत भरत असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेल्या दराने भाडे मंजूर तरतुदीच्या अधिन राहून अदा करण्यात यावे.

**१४) क्षमता संवर्धन :** दि. २९/०१/२०१४ च्या शासन निर्णयानुसार सन २०१४-१५ पासून सर्व प्रकारच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे (विद्या परिषद) ही राज्यस्तरीय प्रशिक्षणाची शिखर संस्था म्हणून काम करणार आहे. त्यामुळे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील सर्व कर्मचारी यांचे क्षमता संवर्धन अंतर्गत प्रशिक्षण उपरोक्त संस्था आयोजित करेल. त्यामुळे सदर उप लेखा शिर्षाखाली मंजूर तरतूद कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय स्तरावर खर्च करू नये. याबाबतच्या स्वतंत्र मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेमार्फत कळविण्यात येतील. तथापि, प्रशिक्षणाचे मुख्य विषय पुढीलप्रमाणे राहतील :

**(रू. लाखात)**

| क्र. | प्रशिक्षण विषय | भौतिक | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|
| १. | बहुवर्ग बहुअध्यापन पद्धतीचा वापर | १२९ | २१.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शाळाबाह्य मुलींकरीता विशेष प्रशिक्षण गुणवत्ता कार्यक्रमाकरीता शिक्षकांचे प्रशिक्षण | १२९ | |
| ३. | कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांचे त्यांच्य विषयनिहाय क्षमता संवर्धन (गणित व भाषा) | १२९ | |
| ४. | आरोग्य व स्वच्छता याबाबत प्रशिक्षण | १२९ | |
| ५. | सर्व गृहप्रमुख, मुख्याध्यापिका यांचे नेतृत्त्व विकास प्रशिक्षण | ८६ | |

१५) **स्वसंरक्षण प्रशिक्षण :** कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील सर्व मुलींकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण उप लेखा शिर्षाखाली प्रती विद्यार्थिनी रू. २००/- प्रमाणे तरतूद मंजूर आहे. याबाबतचा कृती कार्यक्रम जिल्हा स्तरावर तयार करण्यात यावा व त्याचे नियोजन या कार्यालयास सादर करण्यात यावे.

**(एस. चोक्कलिंगम् भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड, गडचिरोली, हिंगोली, जालना, नंदुरबार, परभणी, कोल्हापूर, नांदेड, नाशिक, ठाणे.**

२) **विभागीय शिक्षण उप संचालक, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर, मुंबई विभाग.**

**प्रत : माहितीस्तव सादर,**
**मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

**१) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, कुमठेकर मार्ग, पुणे.**

**४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड, गडचिरोली, हिंगोली, जालना, नंदुरबार, परभणी, कोल्हापूर, नांदेड, नाशिक, ठाणे.**